# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/ ११७, १३२, १४६, १४९, १५० –२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| १) श्री. चनाप्पा कल्लाप्पा कळ्ळी ( केस क्र.११७/२०१०)<br>मु.पो. उटगी, जत, जि. सांगली<br>२) श्री. विजय शिवबसू तेली, ( केस क्र.१३२/२०१०)<br>मु.पो. डफळापूर, ता. जत, जि. सांगली<br>३) श्री. अधीक आण्णू पांढरे, (केस क्र. १४६/२०१०)<br>मु.पो. रामपूर, ता. जत, जि. सांगली<br>४) श्री. निवृत्ती भाऊ कोळेकर, ( केस क्र. १४९/२०१०)<br>मु.पो. आरेवाडी, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली<br>५) श्री. संजय अंकुश निकम,( केस क्र. १५०/२०१०)<br>मु.पो. रामपूर, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत /संख/ कवठे महांकाळ, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

या पाचही तक्रारीं अनुक्रमे ११७/१०, १३२/१०, १४६/१०, १४९/१० व १५०/२०१० यामध्ये तक्रारदाराची मागणी एकच आहे व कायद्याचा मुद्दा एकच आहे म्हणून तक्रारदारांचे प्रतिनिधी व वि.प.च्या अधिकाऱ्यांच्या संमतीने एकत्रित निर्णय करण्यात येत आहे. या पाचही तक्रारी प्रतिनिधी श्री. खापरे यांचेमार्फत दाखल केलेल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

<u>केस क्र. ११७/२०१०</u>

श्री. चनाप्पा कल्लाप्पा कळ्ळी, मु.पो. उटगी, जत, जि. सांगली यांनी मंचाकडे परिशिष्ट अ मध्ये दि. ४.६.२०१० ला तक्रार दाखल केली आहे. तक्रारदाराने आपल्या शेतीपंपासाठी दि. १९.२.२००८ रोजी डीडीएफ योजने अंतर्गत रक्कम भरुन सहा डांबाची वाहिनी उभी करुन कनेक्शन दि. २८.७.२००८ रोजी घेतले आहे. त्यांचे म्हणण्यानुसार सदरचा विद्युत पुरवठा वि.प.ने डी.डी.एफ. योजनेतून दिला आहे, तो राज्य आयोगाचे आदेशाचे विपरीत आहे. डी.डी.एफ. योजना कशा पध्दतीने राबवायची त्यातील तांत्रिक व आर्थिक बाबी काय आहेत या बाबत मा. आयोगाने केस क्र. ५६/२००७ दि. १६.२.२००८ नुसार वि.प.स आदेश दिलेले आहेत. तक्रारदाराने आपल्या तक्रारीत पॅरा. २ मध्ये कलम (९) विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ मधील डी.डी.एफ. च्या व्याख्येवर भर दिला आहे.

Dedicated Distribution Facility means such facilities, not including a service-line, forming part of distribution sytem of the Distribution Licensee which are clearly and solely dedicated to the supply of electricity to a single consumer or a group of consumers on the same premises or contiguous premises.

तसेच मा. विद्युत नियामक आयोगाचे केस क्र. ५६/२००७ नुसार आदेश पारीत करण्यापूर्वी मा. आयोगाने वितरण कंपनीस त्यांच्या जबाबदारीचीही जाणीव करुन दिली आहे की,

Consumers should not be burdened with infrastructure costs which are the liability of MSEDCL

केस क्र. ५६/२००७ नुसार डी.डी. एफ. योजनेची अंमलबजावणी करतांना खालील महत्वाच्या तांत्रिक व आर्थिक बाबींची वितरण कंपनीने काटेकोरपणे अंमलबजावणी करणेची आहे.अन्यथा हा मा. आयोगाच्या आदेशाचे पालन न करणे या बाबत विद्युत अधिनियम २०३ च्या कलम १४२ व १४९ नुसार कारवाईची मागणी करण्या इतपत गंभीर बाब होऊ शकते.

A) It is clear from this defined term that mere extension or tapping of the existing line (LT to HT) can not be treated as Dedicated Distribution Facility.

B) Such extension or tapping being part of the common net work will be affected due to any fault or outages on the common net work and can not considered as a facility solely or clearly dedicated for giving supply.

C) Thus, in the distribution system, Dedicated Distribution Facility means a separate distribution feeder or line emanating from a transformer or a substation or a switching station laid exclusively for giving supply to a cosumer or a group of consumers.

D) Also, Dedicated Distribution Facilities can not be shared in future by other consumers.

E) Such facilities can not be imposed on a consumer

F) If the consumer does not seek Dedicated Distribution Facility, the licensee has to develop its own infrastructure to give electric supply within the period stipulated in Section 43 of the EA 2003 read with the Maharashtra Electricity Regulatory Commission (Standards of Performance of Distribution Licensees, Period for Giving Supply and Determination of Compensation) Regulations, 2005.

तक्रारदाराने आपल्या तक्रारीत वि.प.ने मा. आयोगाच्या आदेशानुसार परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ काढले त्यावर भर दिला आहे. त्यामध्ये मा. आयोगाच्या केस क्र. ५६/२००७ मधील आदेशाचा संदर्भ विचारात घेवून योग्य त्याच्या अंमलबजावणीसाठी उप विभागीय कार्यालयापर्यंतच्या सर्व स्तरावरील प्रसिध्दीसाठी जारी केले आहे. डी.डी.एफ. योजनेची अंमलबजावणी एकाच पध्दतीने व्हावी यासाठी खालील प्रमाणे कार्यप्रणाली निश्‍चित करण्यात आलेली आहे.

| Sr. No. | Particulars | Recovery of charges |
|---|---|---|
| 1 | 1.4 L.T. Non-Domestic<br>1.5 All LT agriculture consumers<br>1.6 All LT Industrial individual or group consumers | a) All the infrastructure will be created by MSEDCL and only Schedule of charges as approved by MERC Order dated 8th Sept.2006 ( Case No. 70/2005) will be recovered.<br>b) If the consumer/ group of consumers wants early connections and opts to execute the work and bears the cost of infrastructure then the refund of the cost of infrastructure will begiven by way of adjustment through energy bills<br>c) While releasing load in complex …. |

वि.प.च्या सदर परिपत्रकामध्ये जर विद्युत पुरवठा डी.डी. एफ. योजनेतून केला असेल तर

A separate account of such connections shall be maintained for official purpose असे म्हटले आहे.

तक्रारदाराचे म्हणण्यानुसार वि.प.ने राबविलेली डी.डी. एफ. योजना अयोग्य आहे, मा. आयोगाचे निर्देशाप्रमाणे नाही. कांही केसेसमध्ये वि.प.ने योजना बदलून स्वत:च्या खर्चाने विद्युत पुरवठा केला आहे. तक्ररदाराने आपल्या तक्रारीत मा. आयोगाच्या केस क्र. ३६/२००९ मधील आदेशाचा संदर्भ घेतला आहे. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार वि.प.ने मा. आयोगाच्या आदेशाचे पालन केले नाही. कलम १४२ खालील आयोगाकडे ३६/२००९ तक्रार दाखल करुन त्याच्या आधारे प्रस्तुतची तक्रार मंचाकडे दाखल केली आहे. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांनी तक्रार क्र. ८२५ दि. १५.२.२०१० बाबत आदेश क्र. ४४७३ दि. ७.४.२०१० नुसार विद्युत नियामक आयोगाने दिलेला निर्णय केस क्र. ३६/२००९ संदर्भातील होता. तरी सुध्दा एम.ई.आर.सी. आदेशाचा अभ्यास करुन व डी.डी.एफ. परिपत्रकांचा अभ्यास करुन नियमाप्रमाणे उचित कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत. त्याच्या नाराजीने प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. ४.६.२०१० रोजी दाखल केली आहे. मंचास तक्रारदार यांनी खालील प्रमाणे अपेक्षित कार्यवाहीची विनंती केली आहे.

मा. राज्य वीज नियामक आयोग यांचा आदेश क्र. ३६/२००९ विचारांत घेता वितरण कंपनीस खालील आदेश मिळावेत –

१) वितरण कंपनीने मा. आयोगाच्या आदेशाचे व मुळ डी.डी. एफ. व्याख्येचे पालन केलेले नाही हे जाहीर होऊन मिळावे

२) वितरण कंपनीने ग्राहक तक्रारदाराचे अंदाजपत्रक मा. मंचाला सादर करावे व त्याची एक प्रत ग्राहक प्रतिनिधीला देण्यात यावी

३) मा. आयोगाच्या आदेश क्र. ३६/२००९ नुसार तक्रारदार ग्राहकास अंदाजपत्रकीय रक्कम रोख मिळावी

४) ग्राहकाने चलन भरले दिनांकापासून वरील रक्कम मिळेपर्यंतच्या कालावधीसाठी विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६२(६) नुसार व्याज मिळावे

वि.प.ने आपल्या दि. २९.६.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी दि. १९.२.२००८ रोजी अनामत रक्कम भरली आहे व त्यांना डी.डी. एफ. योजनेतून क नेक्शनची मंजुरी दिली आहे. तक्रारदार श्री. चनाप्पा कल्लाप्पा कळ्ळी, मु.पो. उटगी व श्री. गिरमल्ला शिवाप्पा कत्ते, मु.पो. उटगी यांना एकत्रितरित्या ०.४२ लघुदाव वाहिनी मंजूर करण्यात आली आहे. तक्रारदाराच्या मर्जीनुसार त्यांना डी.डी. एफ. योजनेतून कि.मी. लघुदाब वाहिनी मंजूर आहे. त्यापैंकी तक्रारदार श्री. चनाप्पा कल्लाप्पा कळ्ळी यांनी स्वत: खर्चाने व स्वत:च्या मर्जीनुसार डी.डी.एफ. योजनेअंतर्गत ०.३६ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम कंपनीच्या मार्गदर्शनाखाली तयार करुन घेतले आहे. सदरची लाईन ही असलेल्या लघुदाब वाहिनीच्या जाळयाच्या विस्तारातूनच करुन घेतलेली आहे व त्यासाठी स्वतंत्र त्यासाठी स्वतंत्र उच्चदाब वाहिनी, रोहित्र व सब स्टेशनची उभारणी केलेली नाही. वि.प.ने सदरचे काम डी.डी.एफ. योजनेअंतर्गत असून त्यामध्ये मा. आयोगाच्या आदेशाचे उल्लंघन करण्याचा हेतू नव्हता. महावितरण कंपनी ही एम.ई.आर.सी. च्या नियमावलीनुसार काम करत आहे व करत राहील. त्यामुळे तक्रारदाराची १४२ कलमाची विनंती मान्य करण्यात येवू नये. सदर कामाची मंजुरी मंडल कार्यालय येथून मिळाली असल्याने अंदाजपत्रकाची प्रत मा. मंचास व ग्राहक प्रतिनिधीस मंडल कार्यालयातून घेवून सुनावणीचेवेळी सादर करण्यात येईल. तसेच ग्राहकास स्वतंत्र उच्चदाब वाहिनी व रोहित्रच्या माध्यमातून कनेक्शन न दिल्याने इन्फ्रास्ट्रक्चरची किंमत वापस करण्याची कंपनीची तयारी आहे. कंपनीच्या ऑडीटरनी तपासलेला खर्चाचा हिशोब दिला आहे.

केस क्र. १३२/२०१०

श्री. विजय शिवबसू तेली, मु.पो. डफळापूर, ता. जत, जि. सांगली यांनी आपल्या शेतीपंपासाठी गट क्र. ४ मध्ये दि. २०.७.२००८ रोजी डी.डी. एफ. योजनेतून वीज पुरवठा घेतलेला आहे. त्यांचे म्हणण्यानुसार सदरचा विद्युत पुरवठा वि.प.ने डी.डी.एफ. योजनेतून दिला आहे, तो राज्य आयोगाचे विपरीत आहे. त्यामुळे अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ६.२.२०१० रोजी क्ष फॉर्ममध्ये तक्रार दाखल केली आहे. अंतर्गत कक्षाने दि. १७.४.२०१० ला आदेश देवून एम.ई.आर.सी. आदेशाचा अभ्यास करुन व डी.डी.एफ. परिपत्रकांचा अभ्यास करुन नियमाप्रमाणे उचित कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत. त्याच्या नाराजीने प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. १९.६.२०१० रोजी दाखल केली आहे. त्यामध्ये अंदाजपत्रकाप्रमाणे भरलेली रक्कम रोख मिळावी व ती मिळेपर्यंतच्या कालावधीचे व्याज मिळावे अशी मागणी केली आहे. तक्रारीतील इतर मजकूर वर केस क्र. ११७/२०१० मध्ये उल्लेख केल्यानुसारच आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ८.७.२०१० लेखी अहवालात तक्रारदार यांनी दि. ४.१२.२००७ रोजी अनामत रक्कम भरली असल्याचे म्हटले आहे. त्यांनी एस.ए. ३ – रु. २५०० व १.३% नॉरमेटीव्ह चार्जेसपोटी रु. ९५१/– असे एकूण रु. ३४५१/– भरले आहेत.त्यांना डी.डीएफ. योजनेतून मंजुरी देण्यात आले आहे. त्यांनी ०.३ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम कंत्राटदारामार्फत स्व: खर्चाने करुन घेतले आहे. तक्रारदारास ग्राहकास दि. २९.७.२००८ रोजी कनेक्शन देण्यात आले आहे. सदरचे कनेक्शन वि.प.च्या लघुदाब वाहिनीच्या सद्यस्थितीतील जाळ्यातून देण्यात आलेले आहे व त्यासाठी स्वतंत्र उच्चदाब वाहिनी, रोहित्र व सब स्टेशनची उभारणी केलेली नाही. करार झाला आहे पण त्याची या कार्यालयात उपलब्ध नाही पण त्यात असा उल्लेख आहे की, लघुदाब वाहिनीचे काम ग्राहकाने आपल्या मर्जीने व स्व: खर्चाने कंपनीच्या नियंत्रणाखाली करावयाचे सदर जागेचा नकाशा सोबत जोडण्यात येत आहे.अंदाजपत्रकाची प्रत सुनावणीचेवेळी देण्यात येईल. तसेच ग्राहकास स्वतंत्र उच्चदाब वाहिनी व रोहित्रच्या माध्यमातून कनेक्शन न दिल्याने इन्फ्रास्ट्रक्चरची किंमत वापस करण्याची कंपनीची तयारी आहे. कंपनीच्या ऑडीटरनी तपासलेला खर्चाचा हिशोब दिला आहे.

केस क्र. १४६/२०१०

श्री. अधीक आण्णू पांढरे, मु.पो. रामपूर, ता. जत, जि. सांगली यांनी परिशिष्ट अ मध्ये मंचाकडे दि. ६.७.२०१० ला तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी शेतीपंपासाठी दि. २२.८.२००८ ला विद्युत पुरवठा घेतला. हा वीज पुरवठा ७.५ अश्वशक्ती इतका विहिरीवरील शेतीपंपासाठी गट क्र. १६५/२ मध्ये घेतलेला आहे. वि.प.ने हा वीज पुरवठा डीडीएफ योजनेतून दिला. तो मा. राज्य आयोगाच्या आदेशाच्या विपरीत आहे.

अंतर्गत कक्षाकडे दि. ७.५.२०१० रोजी अर्ज केला. अंतर्गत कक्षाने दि. ७.५.२०१० ला वि.प.ला एम.ई.आर.सी. आदेशाचा अभ्यास करुन व डी.डी.एफ. परिपत्रकांचा अभ्यास करुन नियमाप्रमाणे उचित कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत. सदरच्या आदेशाच्या नाराजीने प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि.६.७.२०१० ला दाखल केली. त्यामध्ये अंदाजपत्रकाची एक प्रत मिळावी व अंदाजपत्रकाप्रमाणे भरलेली रक्कम रोख मिळावी व सदरची रक्कम परत मिळेपर्यंतच्या कालावधीचे व्याज मिळावे अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि.२७.७.२०१० लेखी अहवालात तक्रारदार यांनी दि. २१.२.२००८ रोजी अनामत रक्कम भरली असल्याचे म्हटले आहे. त्यांना डी.डीएफ. योजनेतून मंजुरी देण्यात आले आहे. त्यांनी ०.१२ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम कंत्राटदारामार्फत स्व: खर्चाने करुन घेतले आहे. तक्रारदारास ग्राहकास दि. २२.८.२००८ रोजी कनेक्शन देण्यात आले आहे. सदरचे कनेक्शन वि.प.च्या लघुदाब वाहिनीच्या सद्यस्थितीतील जाळ्यातून देण्यात आलेले आहे व त्यासाठी स्वतंत्र उच्चदाब वाहिनी, रोहित्र व सब स्टेशनची उभारणी केलेली नाही. करार झाला आहे पण त्याची या कार्यालयात उपलब्ध नाही पण त्यात असा उल्लेख आहे की, लघुदाब वाहिनीचे काम ग्राहकाने आपल्या मर्जीने व स्व: खर्चाने कंपनीच्या नियंत्रणाखाली करावयाचे सदर जागेचा नकाशा सोबत जोडण्यात येत आहे.अंदाजपत्रकाची प्रत सुनावणीचेवेळी देण्यात येईल. तसेच ग्राहकास स्वतंत्र उच्चदाब वाहिनी व रोहित्रच्या माध्यमातून कनेक्शन न दिल्याने इन्फ्रास्ट्रक्चरची किंमत वापस करण्याची कंपनीची तयारी आहे. कंपनीच्या ऑडीटरनी तपासलेला खर्चाचा हिशोब दिला आहे.

केस क्र. १४९/२०१०

श्री. निवृत्ती भाऊ कोळेकर, मु.पो. आरेवाडी, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली यांनी आपल्या शेतीपंपासाठी गट क्र.२६१ मध्ये विंधन विहिरीवरील ३ अश्वशक्ती वीज कनेक्शनसाठी वि.प.च्या कार्यालयाकडे संपर्क साधला. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार असा विद्युत पुरवठा तात्काळ पाहिजे असल्याने त्यांनी सी.एस.एस. या योजनेखाली घ्यावा असे वि.प.ने त्यांना सांगितले. वि.प.कडे वीज मागणी अर्ज दिल्यावर मंजुरीनुसार चलन क्र. २४ दि. १०.४.२००७ रु. ३४८५/– हे पावती क्र. ००७९२४२ नुसार दि. १२.४.२००७ रोजी भरले आहेत. त्यासाठी वि.प.ने १ डांब मंजूर केला, मात्र प्रत्यक्षात एकूण चार डांबांची आवश्यकता आहे हे लक्षात येताच वितरण कंपनीने तीन डांबांसाठी अंदाजपत्रकीय मंजुरी क्र. ४९९ दि. १.१०.२००७ नुसार चलन क्र. ७८७ दि. १९.१०.२००७ नुसार दिलेले चलनानुसार तक्रारदार यांनी जादा रु. ५९७/– पावती क्र. ४१४१४५६ दि. २२.१०.२००७ नुसार भरले. तक्रारदार यांनी सर्व लाईन स्वखर्चाने करतांना लागणारे सर्व्हीस कनेक्शन साहित्य व मे. वृषाली इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग, कवठे महांकाळ यांच्याकडून मीटर क्र. ७०२००१० पावती क्र.१०६ दि. २९.४.२००७ नुसार रु. ६०००/– ला विकत घेतला. त्यानंतर तक्रारदार यांनी कंपनीच्या सांगण्यावरुन व मार्गदर्शनाखालील कंत्राटदाराकडून एकूण चार डांबांची वाहिनी उभी करुन घेतली आहे व त्यानां वि.प.ने दि. ९.१.२००८ ला विद्युत पुरवठा केला आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार चुकीच्या डीडीएफ योजनेतून वीज पुरवठा दिला. त्यांचे आक्षेप केस क्र. ११७/२०१० मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे तेच आक्षेप आहेत. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. ६.४.२०१० रोजी रितसर तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने आजतागायत आदेश पारीत केलेले नाहीत. मंचाकडून अपेक्षित मदत – अंदाजपत्रक मंचासमोर सादर करुन त्याची प्रत मिळणे, ग्राहकास अंदाजपत्रकाप्रमाणे रक्कम रोख मिळावी, चलन भरल्यापासून खर्चाची रक्कम परत मिळेपर्यंत विद्युत कायदा २००३ मधील कलम ६२(६) नुसार व्याज मिळावे. विद्युत नियामक आयोगाचे शेडयूल ऑफ चार्जेस प्रमाणे मिटरचा खर्च हा वि.प.ने देण्याचा असलेने मीटर पावतीप्रमाणे रक्कम परत मिळावी.

वितरण कंपनीने आपल्या दि. २७.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी दि. १२.४२००७ व २२.१०.२००७ रोजी अनामत रक्कम भरल्याचे मान्य केले. त्यांना डी.डी.एफ. योजनेतून मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यांचे लघुदाब वाहिनीचे काम कंत्राटदारामार्फत स्वखर्चाने त्यांनी करुन घेतले आहे. सदरचे कनेक्शन हे वितरण कंपनीच्या लघुदाब वाहिनीच्या सद्यस्थितीतील जाळ्यातून देण्यात आलेले आहे. त्याच्यासाठी स्वतंत्र उचदाब वाहिनी, रोहित्र व सब स्टेशन उभारणी केलेली नाही. लघुदाब वाहिनीचे काम ग्राहकाने आपल्या मर्जीने व स्व:खर्चाने कंपनीच्या नियंत्रणाखाली केलेले आहे. वि.प.ने त्यांना दि. २४.२.२००८ रोजी वीज कनेक्शन दिले आहे. वितरण कंपनी एम.ई.आर.सी.च्या नियमावलीनुसार काम करते व करीत राहील, त्यामुळे तक्रारदाराची १४२ कलमाची विनंती मान्य करण्यात येवू नये. तक्रारदार ग्राहकास स्वतंत्र उचदाब वाहिनी व रोहित्राच्या माध्यमातून कनेक्शन दिलेले नाही म्हणून इन्फ्रास्ट्रक्चची किंमत वापस करण्याची कंपनीची तयारी आहे. कंपनीच्या ऑडीटरनी तपासलेला खर्चाचा हिशोब दिला आहे.

केस क्र. १५०/२०१०

श्री. संजय अंकुश निकम, मु.पो. रामपूर, ता. जत, जि. सांगली यांनी आपली शेतीसाठी ५ अश्वशक्ती विद्युत पुरवठा घेतला आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार ज्या डी.डी.एफ. योजनेतून वीज जोडणी दिली आहे ती आयोगाच्या आदेशा विरुध्द आहे. तक्रार क्र. ११७/२०१० मध्ये सुरुवातीला उल्लेख केल्याप्रमाणे तेच कथन या तक्रारीत केले आहे. मा. आयोगाची केस क्र. ५६/२००७ मधील आदेशानुसार वि.प.च्या मुख्य कार्यालयाने २०.५.२००८ चे परिपत्रक काढले आहे.

यापूर्वी तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र. ६२६ दि. १०.१२.२००९ रोजी रितसर तक्रार दाखल केली आहे व अंदाजपत्रकाची रक्कम एक रकमी मिळावी अशी मागणी केली आहे. अंतर्गत कक्षाने दि. ७.५.२०१० च्या आदेशात एम.ई.आर.सी. आदेशाचा अभ्यास करुन व डी.डी.एफ. परिपत्रकांचा अभ्यास करुन नियमाप्रमाणे उचित कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत. या तक्रारीत मंचाकडून अपेक्षित मदत –

वि.प.ने मा. आयोगाच्या आदेशाचे व मूळ डी.डी. एफ. व्याख्येचे पालन केलेले नाही हे जाहीर होऊन मिळावे, वि.प.ने ग्राहक तक्ररदाराचेअंदाजपत्रक मा. मंचाला सादर करावे व त्याची एक प्रत ग्राहक प्रतिनिधीला देण्यात यावी, मा. आदेश क्र३६/२००९ नुसार ग्राहकाला अंदाजपत्रकीय रक्कम रोख मिळावी, ग्राहकाने चलन भरले दिनांकापासून वरील रक्कम मिळपर्यंतच्या कालावधीसाठी विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६२(६) नुसार व्याज मिळावे.

वितरण कंपनीने आपल्या दि. २७.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी दि. १०.१०२००७ रोजी अनामत रक्कम भरल्याचे मान्य केले. त्यांना डी.डी.एफ. योजनेतून मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यांचे लघुदाब वाहिनीचे ०.१२ कि.मी. चे आहे व त्यांनी हे काम कंत्राटदारामार्फत स्वखर्चाने त्यांनी करुन घेतले आहे. सदरचे कनेक्शन हे वितरण कंपनीच्या लघुदाब वाहिनीच्या सद्यस्थितीतील जाळ्यातून देण्यात आलेले आहे. त्याच्यासाठी स्वतंत्र उचदाब वाहिनी, रोहित्र व सब स्टेशन उभारणी केलेली नाही. लघुदाब वाहिनीचे काम ग्राहकाने आपल्या मर्जीने व स्व:खर्चाने कंपनीच्या नियंत्रणाखाली केलेले आहे. वि.प.ने त्यांना दि. ६.६.२००८ रोजी वीज कनेक्शन दिले आहे. वितरण कंपनी एम.ई.आर.सी.च्या नियमावलीनुसार काम करते व करीत राहील, त्यामुळे तक्रारदाराची १४२ कलमाची विनंती मान्य करण्यात येवू नये. तक्रारदार ग्राहकास स्वतंत्र उच्चदाब वाहिनी व रोहित्राच्या माध्यमातून कनेक्शन दिलेले नाही म्हणून इन्फ्रास्ट्रक्चची किंमत वापस करण्याची कंपनीची तयारी आहे. या अहवालासोबत कंपनीच्या ऑडीटरनी तपासलेला खर्चाच्या हिशोबाचा तपशील व जागेचा नकाशा जोडला आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २८.७.२०१० रोजी सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.तर्फे श्री. भोसले, कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ विभाग व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता हजर. श्री. खापरे यांनी मंचासमोर तोंडी व त्यानंतर लेखी निवेदन दि. २७.७.२०१० चे दि. २८.७.२०१० ला दिले. त्यानंतर ५ ऑगस्टला लेखी तक्रारी दिल्या. श्री. खापरे यांचे प्रामुख्याने म्हणणे की, या सर्व तक्रारदारांना दिलेला विद्युत पुरवठा हा कृती मानके विनिमय व शेड्यूल ऑफ चार्जेसच्या विसंगत आहे. वि.प.ने डी.डी.एफ. योजनेच्या विरुध्द कृती केली आहे. ग्राहकास मिटरची किंमत, कपॅसिटर टेस्टिंग फी व इतर खर्च वसूल करता येतो. तक्रारीत उल्लेख केल्याप्रमाणे विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ मधील कलम २(१) प्रमाणे डी.डी.एफ. योजनेची अंमलबजावणी झालेली नाही. तसेच मा. विद्युत नियामक आयोगाच्या केस क्र. ५६/२००७ मधील आदेशाचे पालन झाले नाही. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार मा. आयोगाच्या शेड्यूल ऑफ चार्जेसच्या मंजुरीनुसार एस्टिमेट तयार करुन नॉरमेटिव्ह चार्जेस वसूल केलेले आहेत. तक्रार क्र. ११७/२०१० मध्ये श्री कळ्ळी यांना रु. ७५९६२/– परतावा रोख रकमेने मिळावा, यासाठी मा. लोकपाल यांच्या केस क्र. ४६/२००८ मधील आदेशावर विसंबून राहिले.

वितरण कंपनीतर्फे श्री. भोसले, कार्यकारी अभियंता यांनी इन्फ्रास्ट्रक्चर कॉस्ट तक्रारदार ग्राहकाच्या वीज बिलातून परत करण्यात येईल त्यावर व्याज लावू नाही असे मंचासमोर प्रतिपादन केले.

आपल्या म्हणण्यापुष्ट्यर्थ तक्रारदार यांनी खर्च केलेल्या साहित्याच्या किंमतीचे ऑडीटेड स्टेटमेंट प्रत्येक केसमध्ये जोडले आहे. श्री. भोसले यांनी वि.प.च्या परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ चा संदर्भ देवून इन्फ्रास्ट्रक्चर कॉस्ट रोखीने न देता वीज बिलातून द्यावी असे वि.प.च्या वरिष्ठांचे आदेश आहेत त्यानुसार पैंसे बिलातून परत देण्यात येतील.

श्री. खापरे यांनी आपल्या दि. २८.७.२०१० च्या लेखी तक्रारीमध्ये केस क्र. ३६/२००९ मधील मा. आयोगाच्या आदेशामध्ये अंदाजपत्रकाची रक्कम रोखीने एक रकमी देणेची आहे. त्यामुळे या सर्व पाचही तक्रारीमध्ये अंदाजपत्रकाची रक्कम एक रकमी व्याजासह परत करावी व ज्या ग्राहकांना मीटर विकत घ्यावा लागला आहे त्याही ग्राहकांना मिटरची किंमत शेड्यूल ऑफ चार्जेस प्रमाणे वरील प्रमाणे रोख परत मिळावी, असा आदेश व्हावा अशी मंचाला विनंती केली आहे. आपल्या दि.५.८.२०१० च्या लेखी तक्रारीत ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी म्हटले आहे की, वितरण कंपनीने वरील तक्रारीबाबत दि. २८.७.२०१० रोजी आपली भूमिका मा. मंचासमोर मांडली आहे. त्याची प्रत अचानक ग्राहक प्रतिनिधींना दिलेने त्या संदर्भात ग्राहक प्रतिनिधींनी आपले कायदेशीर म्हणणे दि. २८.७.२०१० रोजी मा. मंचाकडे दाखल केले आहे. वि.प.ने मा. राज्य आयोगाने दिलेल्या शेड्यूल ऑफ चार्जेस प्रमाणेच ग्रहकाकडून वसुली करावयाची आहे. वितरण कंपनी मा. आयोगाने मंजुरी दिल्या शेड्यूल ऑफ चार्जेसच्या १.३% नॉरमेटिव्ह चार्जेस वसूल करते तेव्हा मा. आयोगाने मंजुरी दिलेल्या खर्चाच्या १.३% नॉरमेटिव्ह चार्जेस वसूल करावेत. त्यासाठी वेगवेगळ्या कनेक्शनची उदाहरणे दिलेली आहेत. वि.प.ची भूमिका आपल्या ऑडीटरांच्याकडून घेतलेला अहवाल ज्या तपासणी अहवालाप्रमाणे आम्ही परतावा परत देऊ ही घेतलेली भूमिका कायदेशीर नाही. तक्रारदार ग्राहकांकडून वसूल करुन घेतलेली १.३% नॉरमेटिव्ह चार्जेस ही अंदाजपत्रकाच्या १.३% आहे व ही अंदाजपत्रके ही मा. राज्य आयोगाने दिलेल्या शेड्यूल ऑफ चार्जेस मंजुरीनुसार आहेत. त्यामुळे वितरण कंपनीच्या चुकीच्या डी.डी.एफ. बाबत परतावा द्यावयाचा झालेस तो पूर्ण अंदाजपत्रकीय रकमेचा द्यावा ही नम्र विनंती. अशा परिस्थितीत ग्राहक प्रतिनिधींच्या दि. ५.८.२०१० च्या लेखी कथनाबद्दल वितरण कंपनीचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे.

ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता मंचासमोर दि. १७.८.२०१० ला उपस्थित असतांना, वि.प.चे अधिकारी श्री. कुलकर्णी यांना श्री. खापरे यांच्या दि. ५.८.२०१० च्या लेखी कथनावर कांही उत्तर देणार आहे काय ? असे विचारले असतां, त्यांनी लेखी उत्तर देण्यास ३ दिवसाची मुदत मागितली व दोन केसेसमध्ये अंदाजपत्रक हजर करतो असे सांगितले. तथापि ते हजर न करता दि. २०.८.२०१० च्या सायंकाळी ५.२५ वाजता श्री. कुलकर्णी यांनी मंचामध्ये दूरध्वनी करुन सदर माहिती सादर करण्यासाठी २४.८.२०१० अखेर मुदत देण्याची विनंती केली, ती मंचाने मान्य केली. वि.प.च्या अधिकाऱ्यांनी मंचासमोर कबूल केल्याप्रमाणे दि. २४.८.२०१० ला ग्राहकाचे लेखी तक्रारीस उत्तर दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार अंदाजपत्रक व प्रत्यक्षात कामास लागणारे साहित्य व इतर बाबी पर्यायाने अंदाजपत्रकीय रक्कम व प्रत्यक्ष कामासाठी झालेला खर्च यात तफावत असू शकते. तक्रारदाराने अंदाजपत्रकात नमूद केल्याप्रमाणे १.३% नॉरमेटीव्ह चार्जेस भरलेले आहेत. ग्राहकास यापूर्वी म्हटल्याप्रमाणे त्यांना लागलेली इन्फ्रास्टक्चर किंमत येणाऱ्या बिलातून कंपनी वापस करण्यास तयार आहे. अंदापजपत्रकातील पूर्ण रक्कम वापस करणे शक्य नाही, कारण त्यामध्ये प्रत्यक्ष लागलेले साहित्य व अंदाजपत्रकात इतर बरेच चार्जेस लावलेले असतात, जे ग्राहकास वापर करणे योग्य होणार नाही. उदाहरणादाखल तक्रार क्र. १४६/२०१० (श्री. अधिक अनु. पांढरे ) या तक्रारदाराच्या संदर्भात अंदाजपत्रकीय रक्कम ज्याच्यामध्ये इतर चार्जेससुध्दा लावलेले आहेत व प्रत्यक्ष लागलेले साहित्य व याची किंमत ( इन्फ्रास्टक्चर किंमत + १०% + ५% ट्रान्स्पोर्टेशन चार्जेस) जे कंपनी वापस करण्यास तयार आहे याचा फरक दाखविला आहे.

दि. १.९.२०१० रोजी दुपारी १२.३० वाजता ग्रा.तक्रार क्र. १०९/२०१० मधील न्याय निर्णयाचे डिक्टेशन चालू असतांना श्री. खापरे यांचा निकाला विषयी फोन आला. त्यावेळी मंचाकडे दाखल डीडीएफच्या प्रकरणांत वितरण कंपनीच्या दि. २४.८.२०१० च्या म्हणण्याच्या अनुषंगाने आपले म्हणणे दाखल करणार आहात काय ? अशी विचारणा केली असतां, मला कांही म्हणणे दाखल करावयाचे नाही व तसा लेखी रिपोर्ट मी पोष्टाने अथवा फॅक्सने पाठवित आहे, तसेच यापूर्वीच्या केसेसमध्ये नॉर्मेटीव्ह चार्जेस परत दिलेले आहेत असे श्री. खापरे यांनी सांगितले.

मंचासमोर दि. १७.८.२०१० रोजी सुनावणीचेवेळी श्री. खापरे यांनी केस क्र. ११७/१० मध्ये उत्तर देतानां एस्टिमेट कॉस्ट रु. ६६७७५/– ही एम.ई.आर.सी.च्या मान्यतेनुसार सर्व खर्चासहित तसेच मिटरची किंमत रु.३१००/– परत मिळावी अशी मागणी केली आणि १.३% नॉरमेटिव्ह चार्जेस रु. ९५१/– वि.प.ने भरुन घेतले आहेत तेही परत मिळावेत अशी मागणी केली.

उभयबाजूंच्या मंचासमोर वरील लेखी कथनानुसार व तोंडी विवेचन केल्याप्रमाणे खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात.

१) तक्रारदार यांनी मागणी केल्याप्रमाणे या सर्व पाचही केसेसमध्ये एस्टिमेट कॉस्ट नॉरमेटिव्ह चार्जेससह परत मागण्याचा त्यांना हक्क आहे काय ?

उत्तर : होय

२) तक्रारदार यांची मीटर कॉस्ट परत मिळण्याची मागणी मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

३) तक्रारदार यांच्या मागणीप्रमाणे सदरची रक्कम रोखीने व्याजासह वि.प.ने त्यांना परत करावी ही मागणी मंजूर करणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय ( आदेशाप्रमाणे)

<u>कारणमिमांसा</u>

या सर्व पाचही तक्रारीमध्ये तक्रारदारांचा मुख्य मुद्दा मा. विद्युत नियामक आयोगाचे केस क्र. ५६/२००७ मधील दि. १६.२.२००८ च्या आदेशानुसार वितरण कंपनीने या सर्व ग्राहकांना दिलेले कनेक्शन हे या आदेशामधील Letter and spirit च्या विरुध्द आहे आणि त्या न्याय निर्णयातील निरीक्षणानुसार जर वि.प.चे लेखी अहवालातील म्हणणे विचारांत घेतले असतां सदरची डी.डी.एफ. योजना वि.प.च्या कवठे महांकाळ विभाग / संख उप विभाग यांनी मा. आयोगाच्या आदेशाच्या विरुध्द राबविली आहे असे खेदाने म्हणावे लागते, कारण की, मा. आयोगाने केस क्र. ५६/२००७ मधील आदेश देण्यापूर्वी विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या अटी विनियम २००५ जे दि. २०.१.२००५ पासून अंमलात आले त्यामधील कलम २ (जी) ची व्याखा दिली आहे ती खालील प्रमाणे –

Dedicated Distribution Facility means such facilities, not including a service-line, forming part of distribution sytem of the Distribution Licensee which are clearly and solely dedicated to the supply of electricity to a single consumer or a group of consumers on the same premises or contiguous premises.

तसेच मा. आयोगाने आपल्या दि. १६.२.२००८ चे केस क्र. ५६/२००७ आदेशामध्ये –

The consumer should not be burdened with infrastructure costs which are the liability of MSEDCL. DDF means a separate distribution feeder or line emanating from a transformer or a sub station or a switching station laid exclusively for giving supply to a consumer or a group of consumers. Such facilities can not imposed on a consumer. it can not be shared in future by other consumers, it is clear from this defined term that mere extension or tapping of the existing line ( LT or HT ) can not be treated as Dedicated Distribution Facility. Such extension of tapping being part of the common net work will be affected due to any fault or outages on the common network and can not be considered as a facility solely or clearly dedicated for giving supply.

वितरण कंपनीने आपल्या लेखी अहवालात सर्व केसेसमध्ये सदरची लाईन ही अस्तित्वात असलेल्या लघुदाब वाहिनीच्या जाळ्यातूनच करुन घेतलेली असून त्यासाठी स्वतंत्र उच्चदाब वाहिनी, रोहित्र वा सब स्टेशनची उभारणी केलेली नाही. वि.प.चे मुख्य कार्यालयाचे परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ रोजी सर्व स्तरावरील प्रसिध्दीसाठी दिले आहे. त्याचा मुख्य उद्देश मा. आयोगाचे केस क्र. ५६/२००७ मधील डी.डी.एफ. योजनेबद्दलची माहिती व अंमलबजावणी बंधनकारक आहे. त्या परिपत्रकातील मजकूर जर ग्राहकाला डी.डी.एफ. योजनेची सवलत नको असेल तर वि.प.ने स्वत: इन्फ्रास्टक्चर उभे करुन विद्युत कायदा २००३ मधील कलम ४३ व कृती मानकानुसार करावा. या ठिकाणी तक्रारदार ग्राहकाचे संमत्तीने त्याला विद्युत पुरवठा डी.डी.एफ. योजनेतून दिला हे वि.प.चे म्हणणे ग्राह्य धरता येणार नाही. तसेच ग्राहकाने डी.डी.एफ. योजनेतून वीज पुरवठ्यासाठी करारनामा करुन दिला असून तो तात्पुरत्या स्वरुपाचा आहे परंतु त्यातील मजकुरावर वि.प. विसंबून रहात आहे. जो करारनामा मंचासमोर हजर केला जात नाही त्यातील मजकुरावर वि.प. विसंबून रहाते हे अनाकलनीय आहे. त्यामुळे ग्राहकाने स्वत:हून डी.डी.एफ. योजनेची माहिती करुन घेवून सवलतीचा फायदा घेतला हे पटत नाही.

वरील विवेचनावरुन मंच या निर्णयाप्रत येत आहे की, डी.डी.एफ. योजनेची अंमलबजावणी मुख्य अभियंता (वितरण) मुंबई यांचे परिपत्रक क्र. २२१९७ आणि विद्युत पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ चे कलम २ (जी) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे व मा. आयोगाचे केस क्र. ५६/०७ मधील दि. १६.२.२००८ च्या आदेशानुसार झालीनाही असे म्हणावे लागते. या ठिकाणी विद्युत कायदा २००३ मधील सेक्शन ४२, ४३ व ४६ नुसार डिस्ट्रीब्यूशन लायसेन्सी म्हणजे या तक्रारीतील प्रतिवादी विद्युत वितरण कंपनी ही कायद्यानुसार Universal Obligation ची पूर्तता करणेस म्हणजेच विद्युत पुरवठ्याची जबाबदारी कलम ४३ नुसार व सेक्शन ४२ (१) मधील तरतुदीनुसार वि.प.वर बांधलेली जबाबदारी आहे.

To develop, maintain and efficiently coordinated and economical system in his area of supply कारण D.D.F. ही exclusively based entailing work of installation of D.D.F. i.e. Distribution Licensee is authorised to recover reasonable expenses incurred on such works from the applicant based on approved Schedule of Charges as per Rule 3.3.3, and provide supply connection immediately after such works are completed or within the time limit prescribed by MSEDCL. and is allowed to recover from the consumer through tariff.

वर उल्लेख केल्याप्रमाणे तक्रारदार प्रतिनिधींनी मा. आयोगाकडील केस क्र. ३६/२००९ मधील निर्णयाचा उल्लेख केला आहे व त्यांचे म्हणण्यानुसार सदर आदेशामध्ये अंदाजपत्रकीय रक्कम व नॉर्मेटीव्ही चार्जेस परत मिळावेत असे म्हटले आहे. या उलट, वि.प.चे अकौंटस् त्यांचे ऑडीटरनी तपासल्याचे दिसते. प्रत्येक केसमध्ये अकौंटस् दाखल केले आहेत त्यानुसार वीज बिलातून परतावा द्यावा काय ?

प्रथमत: वि.प.चा बचाव ऑडीटेड अकौंटसची रक्कम बिलातून देणेस तयार आहेत. ऑडीटेड अकौंटसला कुठल्याही प्रकारचा कायदेशीर पाया नाही किंवा ऑडीटरांची सही आहे म्हणून ते ग्राह्य धरणे योग्य नाही, कारण वि.प.ने आपल्या कार्यालयाचे परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ वर भर दिला आहे. त्यातील अ.क्र. २

Particulars

LT non domestic / L.T. residential

Consumers or group of L.T. consumers of Non-domestic & Residential complex where the load is less than 500 KVA and located within the limits of areas A & B.

Recovery of charges – L.T. Non-domestic, L.T. residential consumers

Consumers will have option to

(a) get connection as Dedicated Distribution Facility (DDF) and bear all the expenditure. The line will reain dedicated to the consumers in future.

or

(b) get the connecton on non-Dedicated Distributon Facility (DDF) basis and bear the expenditure on creation of infrastructure (except the cost of land) which will be refunded to the consumer/s through the energy blls. In this case the infrasturucture will not remain dedicated.

1.1 LT non- domestic, L.T. consumers

All the infrastructure will be created by MSEDCL and only Schedule of C harges as approved by MERC order dated 8th September, 2006 ( case No. 70/2005 ) will be recovered.

वि.प.ची सदरची योजना राबविण्याच्या प्रकारावर ही डेडीकेटेड योजना होत नाही असे म्हणावे लागेल. त्यामुळे झालेला खर्च हा ग्राहकास परत वि.प. वीज बिलातून देईल, कारण केस क्र. ५६/२००७ मध्ये मा. आयोगाने वितरण कंपनीस त्यांच्या जबाबदारीची जाणीव करुन दिली आहे.

The consumer should not be burdened with infrastructure costs which is the liability of MSEDCL.

कारण सदरचे परिपत्रकानुसार वि.प.ने अशा ग्राहकांचे वेगळे अकौंट ठेवले नाहीत हे स्पष्ट आहे. त्यामुळे वि.प.ने आपल्या लेखी अहवालासोबत दाखल केलेले ऑडीटेड स्टेटमेंट जे वि.प.च्या म्हणण्यानुसार, तक्रारदार यांनी वीज कनेक्शनसाठी वापरलेल्या साहित्याची किंमत आहे. ( उदा. केस क्र. ११७/२०१० श्री. चनाप्पा कल्लाप्पा कळ्ळी – रु. ४८९२६/–) या तक्रारीसोबत वि.प.ने तथाकथित डी.डी.एफ. योजनेतून दुसरे शेतकरी श्री. गिरमल्ला शिवाप्पा कत्ते, रा. उटगी यांना दोघांना एकत्रित दिलेल्या एस्टिमेटची किंमत रु.८८६३४/– आहे व तक्रारदार श्री. कत्ते केस क्र. १५/२०१० मध्ये वि.प.ने ०.६ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम त्यापोटी रु. १२६६२/– तक्रारदार (कत्ते) यांना वीज बिलातून व्याजासह परत देण्याची तयारी दर्शविली होती.

या मंचाने वि.प.ला सदरची रककम १२% व्याजाने एकरकमी चेकने देण्याचे आदेश दिले आहेत. तेव्हा वि.प.ने प्रथमत:च या पाचही केसेसमध्ये ग्राहकांनी केलेला लेखा परीक्षित खर्च(Audited expenditure ) हा शेती पंप कनेक्शनसाठीचा आहे असा बचाव घेतला आहे.

या ५ पैंकी ३ केसेसमधील एस्टिमेट कॉस्ट पाहिले असतां, ( केस क्र. ११७/१० मध्ये एस्टिमेट हजर केले नाही) परंतु इतर केसेमध्ये क्लॉज नं. ७

टेक्नीकल सँक्शन नं. HT/LT/Extension/ON/SC

प्रमाणे सदर तक्रारदार ग्राहकांना खालील प्रमाणे १.३% नॉर्मेटीव्ह चार्जेस भरावे लागणार :

| | | | |
|---|---|---|---|
| केस क्र. ११७/१० | .. | रु. | ५९७/- |
| केस क्र. १५०/१० | .. | रु. | ४५०/- |
| केस क्र. १४६/१० | .. | रु. | ३१३/- |
| केस क्र. १३२/१० | .. | रु. | ९५१/- |
| केस क्र. १४९/१० | .. | रु. | ५९७/- |

यावरुन एक गोष्ट स्पष्ट होते की, असे नॉर्मेटीव्ह चार्जेस ग्राहकाकडून वि.प.ने भरुन घेतले आहेत ते तक्रारदार यांस परत मिळणे जरुरी आहे. यावरुन हे स्पष्ट होते, वि.प.ने या पाचही तक्रारीमध्ये लेखा परीक्षित खर्च (Audited expenditure) जो ग्राहकाने खर्च केल्याचे दाखविले आहे तो निश्चितपणे एस्टिमेटच्या विसंगत आहे. ग्राहकाने वि.प.च्या सांगण्यावरुन खर्च करुन वि.प.कडून वीज पुरवठा घेतला आहे, परंतु असे करत असतांना मा. आयोगाच्या केस क्र. ५६/२००७ मधील दि. १६.२.२००८ चा आदेश व वि.प.च्या मुख्य कार्यालयाचे परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ याचे पालन न करता वीज जोडणी देवून योजना राबविली. परंतु मा. आयोगाकडील केस क्र. ७२/२००८ मधील दि. ८.९.२००८ च्या आदेशाविरुध्द ग्राहक तक्रारदार यांना हे सर्व इन्फ्रास्टक्चर उभे करता असतांना खर्च करणे भाग पाडले. त्यामुळे तक्रारदार यांनी मागणी केल्याप्रमाणे एस्टिमेट कॉस्ट प्रत्येक केसमधील व त्यात अंतर्भूत असलेल्या नॉर्मेटीव्ह चार्जेसची रक्कम वि.प.ने तक्रारदार यांस देणे क्रमप्राप्त आहे, ती वि.प.ची जबाबदारी आहे. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे. या वरील मंचाच्या निर्णयास मा. आयोगाची केस क्र. ३६/२००९ मधील दि. १९.१२.२००९ च्या आदेशाने पुष्टी येत आहे. तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे यांनी मा. आयोगाची केस क्र. ३६/२००९ मधील दि. १९.१२.२००९ च्या आदेशाचा आधार घेतला आहे. त्यामध्ये वि.प.ने आदेशामधील पॅरा. १५ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे, वि.प.ने आपल्या कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांच्या शपथपत्रात

Respondent undertakes to refund the estimated value of work carried out by the complainant by adjustment in further energy bill of the complainant.

त्यामुळे वर निरीक्षण केल्याप्रमाणे पहिल्यांदाच वि.प.ने या पाचही केसेसमध्ये ग्राहकांनी केलेला लेखा परीक्षित खर्च(Audited expenditure ) हा शेती पंप कनेक्शनसाठीचा आहे व तो देण्यास तयार आहे असा बचाव घेतला आहे. मंचाचे असे मत झालेआहे की, वि.प.ने आपल्या पूर्वी मा. आयोगाकडे केलेल्या कथनाप्रमाणे वेगळा बचाव म्हणजे पूर्वी ' खर्चाची अंदाजपत्रकाप्रमाणे रक्कम ' व आता ' ग्राहकाने शेतीपंप कनेक्शनसाठी खरेदी केलेल्या साहित्याचा लेखा परीक्षित खर्च ' असा बचाव वि.प. घेवू शकत नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे द्यावे लागते व तक्रारदार यांनी एस्टिमेट व्हॅल्यू व नॉर्मेटीव्ह चार्जेस मागणी केल्याप्रमाणे वि.प.कडून परत मिळण्याचा अधिकार आहे.

हा मंचाचा निर्णय, मा. आयोगाच्या केस क्र. ५६/२००७ मधील आदेशाच्या विपरीत कृती वि.प.ने केल्यामुळे, तक्रारदार यांस त्यांनी केलेला खर्च परत मिळण्याचा हक्क आहे, म्हणून मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे.

(२) तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे यांनी आपल्या दि. २७.७.२०१० च्या लेखी निवेदनात ज्या ग्राहकानां मीटर विकत घ्यावा लागला आहे, त्याही ग्राहकांना मिटरची किंमत शेड्यूल ऑफ चार्जेस प्रमाणे रोखीने परत मिळावी अशी मागणी केली आहे. प्रत्येक तक्रारीत अशा प्रकारची मीटर खरेदी केल्याच्या पावतीनुसार रक्कम परत मिळावी अशी मागणी केली आहे. वि.प.ने आपल्या लेखी अहवालात मिटरच्या किंमतीबद्दल कुठल्याही प्रकारचे वेगळे म्हणणे दिले नाही. इन्फ्रास्टक्चरची किंमत तक्रारदार यांस येणाऱ्या वीज बिलातून समायोजित करण्यास वितरण कंपनी तयार आहे.

तक्रारदार श्री. निवृत्ती भाऊ कोळेकर ( केस क्र. १४९/२०१० ) यामध्ये तक्रारदार यांनी दि. २९.७.२००७ ची मिटरच्या किंमतीची रु. ६०००/– ची झेरॉक्स प्रत मंचासमोर दाखल केली आहे व प्रतिनिधी श्री. खापरे यांनी तक्रारदार श्री. श्री. विजय शिवबसू तेली, मु.पो. डफळापूर, ता. जत, जि. सांगली ( केस क्र. १३२/२०१० ) मध्ये मिटरची किंमत रु. ३१००/– खर्च झाल्याचे सांगितले. इतर कुठल्याही तक्रारीमध्ये मिटर किंमतीची झेरॉक्स दाखल केलेली नाही.

मा. विद्युत नियामक आयोग यांनी केस क्र. ७२/२००५ मध्ये दिलेल्या दि. ८.९.२००६ च्या आदेशामध्ये असे निरीक्षण केले आहे की,

Cost of meter and meter box as per the Section 55 of the Act, it is the responsibility of the Licensee to supply electricity to installation incoporating recommndations made in this regard by the Authority i.e. Central Electricity Authority.

Govt. of India informed CEA installation operation of meter say Regulation 2006 of 17th March 2006, 62(a) , installation operation of meter as per Regulation 2006 may

The above provisions to give new connection should be provided by the Licensee and the cost of the meter, meter box shall be borne by the Licensee except the consumer who purchases the meter from Licensee.

त्यामुळे श्री. खापरे यांनी मा. लोकपाल, मुंबई यांचेकडील पिटीशन क्र ४६/२००८ मधील दि. २७.८.२००८ चे आदेश तक्रारदारांच्या मिटरची किंमत परत मिळण्याच्या मागणीसाठी मंचाकडे सादर केले आहेत. त्यातील पॅरा. ३३ मधील निरीक्षणानुसार –

Plain reading of various provisions referred to above, leaves no doubt to conclude that the meters have to be provided by the distribution Licensee unless the consumer specifically elects to purchase it either from the Distribution Licensee or from the market. At best, the Distribution Licensee, when it provides a meter, may require the consumer to pay security amount not exceeding the price of the meter. It is in this context, that the Respondent failed to advise the Appellant in line with the provision of law and instead, directed him to procure the meter, metering cubicle, etc. clearly in contradiction and violation If law. The Respondent's argument is hollow and not backed by any provision of law and therefore deserves to be and is hereby rejected out right.

केस क्र. ४६/२००८ मध्ये मा. लोकपाल यांनी वि.प.स तक्रारदार ग्राहक यांनी खर्च केलेले क्यूबिकल सीटी अँड पीटीसाठी जे वितरण कंपनीने स्वखर्चाने पुरवावयाचे असतात त्यासाठी तक्रारदार यांनी एकूण रक्कम रु. ९९१५५/- त्याची किंमत वाहतुकीसह खर्च केली आहे ती रक्कम तक्रारदार यांनी वि.प.कडून मागणी केलेली होती मा. आयोगाने या बाबतच्या खर्चाची रक्कम रु. ६७९५८/- निश्चित केली आहे. अशा केसमध्ये जेथे या वस्तू (H.T. metering cubicle including CT & PT) खरेदी करु इच्छितो, अशी रक्कम ग्राहकास परत देणयाचे वि.प.स आदेश दिले आहेत.

वि.प.चे अधिकारी श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता यांनी मंचासमोर कबूल केल्याप्रमाणे तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे यांच्या ५.८.२०१० च्या लेखी कथनास उत्तर देण्यासाठी मुदत घेतली. त्यानुसार दि. २४.८.२०१० रोजी लेखी उत्तर मंचामध्ये दाखल केले आहे. त्यामध्ये मीटर कॉस्टचे मागणीबाबत कांहीच बचाव घेतला नाही. त्यामुळे मुद्दा क्र. २ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे.

वि.प.ने तक्रारदार यांनी ज्या केसमध्ये स्वत: मीटर विकत घेतले आहे त्याची आपल्या रेकॉर्डमधून खातरजमा करुन घेणे किंवा तक्रारदाराने पावती हजर केली असल्यास ती तपासून प्रत्येक केसच्या रेकॉर्डमधील नोंदीनुसार मिटरची किंमत तक्रारीत द्यावी.

(३) या पाचही केसेसची सुनावणी मंचासमोर घेतली असतां, डीडीएफ योजना योग्य रितीने राबविली नाही, मा. आयोगाच्या केस क्र. ५६/२००७ मधील दि. १६.२.२००८ च्या आदेशाचे पालन नाही त्यामुळे प्रश्न राहतो तो परताव्याची रक्कम रोखीने व्याजासह परत करावी किंवा वि.प.ने म्हटल्यानुसार वीज बिलातून समायोजित करण्यात यावी हाच मुद्दा पाचही केसमध्ये प्रमुख मुद्दा झाला आहे. या मुद्दयाकडे वळण्यापूर्वी ग्राहक प्रतिनिधी यांनी १ सप्टेंबरला १२.३० वाजता फोन करुन कांही आदेशाची माहिती घेतली असतां त्यांना मी स्वत: वि.प.च्या उत्तराची कल्पना दिली. त्यांनी मला कांही सांगणे नाही व तसे लेखी पाठवित आहे असे सांगितले. असे असूनही मंचाला अग्रेषित केलेले १ सप्टेंबरचे पत्र दि. १४.९.२०१० ला प्राप्त झाले. त्यामध्ये परत केस क्र. १५/२०१० मधील मंचाच्या आदेशाचा आधार घेतला आहे. त्यामध्ये अंदाजपत्रकाप्रमाणे एकरकमी रक्कम परत देण्याचे आदेश दिले आहेत आणि आपल्या दि. २२.७.२०१० च्या लेखी अहवालात वि.प.ने वेगळ्या कल्पनेबद्दल मा. राज्य विद्युत आयोगाकडून मंजुरी घ्यावी. वि.प.ने आपल्या दि. २५.८.२०१० च्या लेखी अहवालात ज्यामध्ये पूर्वी सांगितल्याप्रमाणे इन्फ्रास्टक्चरची किंमत वितरण कंपनी येणाऱ्या बिलातून वापस करण्यास तयार आहे, अंदाजपत्रकातील पूर्ण रक्कम वापस करण्यास करु शकत नाही. कारण त्यामध्ये प्रत्यक्ष लागलेले साहित्य व अंदाजपत्रकात इतर बरेच चार्जेस लावलेले असतात जे की ग्राहकास वापस करणे योग्य होणार नाही. या म्हणणयाचा परामर्श किंवा विचार करतां मुद्दा क्र. १ चे उत्तर देतांना घेतला आहे. असो.

मा. आयोगाने केस क्र. ९३/२००८ मध्ये १.९.२०१० ला वितरण कंपनीला दिलेल्या आदेशानुसार आदेशामधील पार्ट बी शेड्यूल ऑफ चार्जेस ( आदेश पान क्र. १३ पॅरा १९, क्लॉज नं. ३ मध्ये निरीक्षण केल्याप्रमाणे –

" MSEDCL either has to scrutinise details of all the consumers released during the period of 9th Sept. 2006 to 20th May 2008 for charges levied other than approved Schedule of Charges or publicly appeal either through news pqpers or electricity bills, asking the consumers to contact MSEDCL if such charges are levied on them during the above period. Thereafter MSEDCL should adjust the extra charges collected by MSEDCL in the energy bills of the respective consumers".

या आदेशानुसार तक्रारदार यांनी मा. आयोगाकडे मागणी केल्याप्रमाणे –

पॅरा २ क्लॉज ५

" ORC amount, meter cost and other charges collected or DDF amount earlier to 20.5.2008 till 8.9.2006, may be refunded by way of energy bills as per the prodedure adopted for cases following Circular No. 22197 dated 20.5.2008".

त्यामुळे या पाचही प्रकरणामध्ये वि.प.स तक्रारदारांना डी.डी.एफ. योजनेखाली घेतलेली रक्कम परत करण्याचे आदेश करणे कायदेशीर होईल. तक्रारदाराचे प्रतिनिधी यांनी आपल्या दि. १४.९.२०१० च्या मंचाला अग्रेषित केलेल्या पत्रात या निकालावर विसंबून राहिले आहेत. त्यामध्ये तक्रारदार यांनी केलेले अर्ज या आदेशाला अनुसरुन आहेत असे गृहीत धरुन आदेश व्हावेत अशी मागणी केली आहे. आपल्या माहिती पुष्ट्यर्थ श्री. खापरे यांनी केस क्र. ३६/२००९ मधील मा. आयोगाचा दि. २९.१२.२००९ चा आदेश याचा हवाला घेतला आहे. या उलट, मंचासमोर वि.प.तर्फे श्री. भोसले, कार्यकारी अभियंता यांनी मुख्य कार्यालयाचे मुख्य अभियंता (वाणिज्य) यांचे परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ याचा संदर्भ देवून परताव्याची रक्कम ग्राहकास त्याच्या वीज बिलातून समायोजित करण्याचे आदेश व्हावेत अशी विनंती केली. मंचासमोर तक्रारीमध्ये तक्रारदार यांनी आपल्या तक्रारीत उल्लेख केल्याप्रमाणे क्लॉज बी

If the consumer/ group of cosumers wants early connections and opts to execute the work and bears the cost of infrastructure then the refund of the cost of infrastructure will be given by way of adjustment through energy bills.

त्यामुळे अशी परताव्याची रक्कम ग्राहकाच्या वीज बिलातून समायोजित करण्यात यावी परंतु त्या बाबत कांही बधंन/ अटी ठेवाव्या लागतील.

मा. आयोगाच्या केस क्र. ३६/२००९ मधील दि. २९.१२.२००९ च्या आदेशानुसार

It would therefore be in interests of justice and in consumer interest to direct refund ( which MSEDCL has undertaken to in terms of its affidavit of its Executive Engineer, Kavathe Mahankal on 1.9.2009 before Commission ) at one go in lumpsum.

यापूर्वी मा.आयोगाकडी तक्रारीमध्ये तक्रारदाराने खर्च केलेली रक्कम रु. ७५,०००/– व त्याचे वीज बील त्या केसमध्ये रु. १५८६१/– हे मा. आयोगाने मंजूर केलेल्या टॅरिफ प्रमाणे आहे. प्रत्यक्षात सरकारी सबसिडी धरुन ग्राहकाने द्यावयाची रक्कम रु. १२/– आहे. त्यामुळे

At one go in lumpsum आणि विद्युत कायदा २००३ चे कलम १४२ (३) खाली कारवाई करावी असे तक्रारदाराच्या अर्जाच्या अनुषंगाने आदेश दिले आहेत. असो.

मा. लोकपाल यांच्या दि. २७.८.२००८ चे केस क्र. ४६/२००८ मधील आदेशातील पॅरा ३९ मध्ये

Respondent may make refund by cheque or by adjustment in the appellant's ensuing bill.

या आदेशाकडे श्री. खापरे यांचे दि. १७.८.२०१० ला लक्ष वेधले असतां, मंच किंवा मा. लोकपाल हे परताव्याची रक्कम चेकने किंवा ग्राहकाच्या वीज बिलातून समायोजित करण्या बाबत आदेश करु शकतात याकडे वेधले असता श्री. खापरे यांनी त्या केसमधील ग्राहक औंद्योगिक होता असे प्रतिपादन केले.

या मंचाने मंचासमोरील तक्रार केस क्र. १५/२०१० मध्ये तक्रारदार श्री. गिरमल्ला शिवाप्पा कत्ते व त्यासोबतचा अन्य ग्राहक श्री. चन्नाप्पा कल्लाप्पा कळ्ळी यांच्या एकत्रित अंदाजपत्रकीय रक्कम रु. ८८६३४/– पैंकी तक्रारदार यांच्या हिश्याची रक्कम रु. १२६६२/– रोखीने देण्याचे आदेश केले होते. तक्रारदार यांनी एकाही तक्रारीमध्ये आपल्या शेती पंपाच्या वीज वापराचे एकही बील मंचासमोर आणले नाही, त्याची रक्कम किती हेही सांगितले नाही. त्यामुळे श्री. खापरे यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांप्रमाणे मा. लोकपाल यांच्या दि. २७.८.२००८ चे केस क्र. ४६/२००८ मधील आदेश या केसला लागू होत नाही, कारण त्यातील ग्राहक हा औंद्योगिक ग्राहक होता.

त्यामुळे मा. लोकपाल यांनी वि.प.ला परताव्याची रक्कम बिलातून देण्याची मुभा दिलेली आहे.

Respondent may make refund by cheque or by adjustment in the Appellant's ensuing bill.

महावितरणच्या परिपत्रक क्र. २२१९७ ता. २०.५.२००८ प्रमाणे ग्राहकास लवकर कनेक्शन मिळण्यासाठी त्यांनी इन्फ्रास्ट्रक्चरसाठी केलेला खर्च परत करता येईल. त्या अनुषंगाने मुख्य अभियंता (वितरण) यांनी परतावा कोणत्या पध्दतीने द्यावा या बाबतचे परिपत्रक क्र. ३९२०६ दि. २१.१२.२००९ रोजी निर्गमित केले आहे. त्या परिपत्रकाच्या तिसऱ्या पॅरेग्राफ प्रमाणे –

To adopt the above procedure for refund of such charges, the competent authority i.e. Managing Director, MSEDCL has accorded approval to refund the entire expenditure incurred by prospective consumers for release of supply under dedicated distribution facility (even though the work is not dedicated ) by way of adjusting 50% of the monthly bil amount till clearance of the total expenditure.

सदर परिपत्रकाप्रमाणे दि. २०.५.२००८ नंतर कनेक्शन दिलेल्या ग्राहकांना परतावा महावितरणकडून देण्यात येत आहे.

मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिलेल्या केस क्र. ९३/२००८ दि. १.९.२०१० च्या आदेशानुसार दि. ९.९.२००६ ते २०.५.२००८ दरम्यान विद्युत पुरवठा केलेल्या ग्राहकांकडून Schedule of charges सोडून जर जादा रक्कम वसूल केली असेल तर त्यांनासुध्दा दि. २०.५.२००८ च्या परिपत्रकाप्रमाणे केलेल्या खर्चाची रक्कम येणाऱ्या विद्युत बिलातून देण्यात यावी.

मंचाकडील या पाचही केसमध्ये तक्रारदारांनी दि. २०.५.२००८ पूर्वी नॉर्मेटिव्ह चार्जेस भरुन लवकर कनेक्शन मिळावे या उद्देशाने इन्फ्रास्ट्रक्चर स्वत:च्या खर्चाने उभे केलेले आहे. त्यामुळे त्यांना मा. आयोगाच्या दि. १.९.२०१० च्या आदेशानुसार खर्च केलेल्या रकमेचा परतावा विद्युत बिलातून करणे योग्य होईल. त्यासाठी दि. २०.५.२००८ नंतरच्या ग्राहकांना ज्याप्रमाणे वितरण कंपनी परतावा देत आहे तीच पध्दत वरील ५ तक्रारदारास लागू करणे संयुक्तिक होईल.

वितरण कंपनीच्या परिपत्रक क्र. ३९२०६ दि. २१.१२.२००९ प्रमाणे परतावा DDF (even though work is not dedicated ) योजनेसाठी द्यावा असे स्पष्ट नमूद केले आहे. त्यामुळे वरील पाचही केसेसमध्ये DDF योजनेप्रमाणे दिला असल्यामुळे परतावा करणे योग्य होईल.

कृतीची मानके २००५ मधिल १२.१ चे पहिले परंतुक हे भरपाई देण्यासंदर्भातील असल्यामुळे दोन बिलींग सायकल प्रमाणे परतावा देणे योग्य नाही. त्यामुळे वि.प.च्या मुख्य कार्यालयाने वर नमूद केलेल्या क्र. ३९२०६ दि. २१.१२.२००९ च्या परिपत्रकाप्रमाणे परत करावी असे मंचाचे मत आहे.

तसेच वरील पाचही केसेसमधील झालेले काम हे NonDDF झाले असे गृहीत धरावे लागेल. त्यामुळे परिपत्रक क्र. २५६८० दि. १९.६.२००८ प्रमाणे नॉरमेटिव्ह चार्जेस (१.३% सुपरव्हिजन चार्जेस ) भरुन घेता येणार नाही. त्यामुळे तक्रारदारांनी भरेली नॉरमेटिव्ह चार्जेसची रक्कम वितरण कंपनीने परत करणे संयुक्तिक होईल. त्यामुळे मुद्दा क्र. ३ चे उत्तर होय असे देण्यात येत आहे.

वरील तिन्ही मुद्दयांचे उत्तर होय असे दिल्याने तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

या सर्व तक्रारी दि. ४.६.२०१० ला मंचात दाखल झाल्या. वि.प.ने या पाच केसेसमध्ये वेगवेगळ्या तारखांना लेखी अहवाल देवून प्रस्तुतच्या तक्रारींची सुनावणी सुरुवातीला दि. २८.७.२०१० व त्यानंतर दि. १७.८.२०१० ला मुदत देवून वि.प.ने दि. २४.८.२०१० ला लेखी म्हणणे दिले. तक्रारदार यांनी तोंडी म्हणणे मंचासमोर सांगितल्यानंतर दि. १४.९.२०१० ला दोन वेगवेगळी पत्रे मंचाचे अध्यक्षांना अग्रेषित केलेली कुरियरने प्राप्त झाली, त्यामुळे तक्रार मुदतीत निकाली काढण्यात आली नाही.

## आदेश

१) या पाचही तक्रार मंजूर करण्यात आल्या आहेत.

२) वितरण कंपनीने तक्रारदार यांस त्यांनी केलेला संपूर्ण खर्च प्रचलित पध्दतीप्रमाणे वितरण कंपनीचे परिपत्रक क्र. ३९२०६ दि. २१.१२.२००९ जे की वि.प.चे परिपत्रक क्र. २२१९७ दि. २०.५.२००८ च्या आधारे परताव्याबद्दल आदेश दिले आहेत, त्यानुसार परताव्याची रक्कम वीज बिलातून परत करावी.

३) तसेच तक्रारदारांनी भरलेली नॉर्मेटिव्ह चार्जेसची रक्कम रोखीने / चेकने त्वरीत द्यावी. ज्या ग्राहकांनी मिटरचा खर्च स्वत: केलेला असेल त्यांची पावती हजर केल्यानंतर किंवा वि.प.ने रेकॉर्ड तपासणी करुन ग्राहकाने मिटरचा खर्च केला असेल तर तो ग्राहकास रोखीने / चेकने द्यावा.

४) ग्राहकाने खर्च केलेली परताव्याची रक्कम परतावा सुरु होईपर्यंतच्या कालावधीसाठी १२% (बारा टक्के ) व्याजाने ग्राहकाच्या बिलात समायोजित करण्यात यावी.

५) खर्चाबद्दल आदेश नाही

६) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

७) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष